रे. दि. मु.नं. १०२/२०१३

श्रीमती ऊषा भिकु सोडमिसे वि. हनुमंत भिकु सोडमिसे वगैरे

<u>नि. ६८ आणि ७० खालील संयुक्तिक आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज वादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र. १ हनुमंत भिकु सोडमिसे हे दि. ०१.११२०२३ रोजी मयत झाले असून त्यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला ९७ दिवसांचा विलंब माफ होवून मिळणेसाठी व त्यांचे वारस अभिलेखावर घेणेसाठी दाखल केला आहे. प्रस्तुतचे अर्जासोबत वादीने शपथपत्र दाखल केले आहे.

२. वादी यांचे म्हणणे की, वादीने प्रस्तुत दावा हा वाटपासाठी व जाहिर ठराव होवून मिळणेसाठी व अन्य दादी मंजूर होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. दावा प्रलंबीत असताना प्रतिवादी क्र. १ हनुमंत भिकु सोडमिसे हे दि. ०१.११.२०२३ रोजी मयत झाले. प्रतिवादी क्र.१ यांचे वारस दाव्यात सामील करण्याबाबत वादी यांना यथायोग्य ज्ञान नव्हते. त्यामुळे त्यांचे वारस अभिलेखावर आणण्यासाठी विलंब झाल्याची चुक निदर्शनास आली. त्यामुळे वारस अभिलेखावर घेण्यासाठी ९७ दिवसांचा विलंब झाला. सदरचा विलंब माफ न झाल्यास वादी यांचे अपरिमीत असे नुकसान होईल. मयत प्रतिवादी क्र.१ यांना प्रतिवादी क्र.१-अ वैशाली हनुमंत सोडमिसे (पत्नी), प्रतिवादी क्र.१-ब चि. अभिजीत हनुमंत सोडमिसे अ.पा.क. आई वैशाली हनुमंत सोडमिसे (मुलगा) असे वारस आहेत. सदरचे वारस अभिलेखावर घेणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. तसे न झाल्यास वादी यांचे कधीही न भरुन येणारे असे नुकसान होईल. म्हणून प्रस्तुतचा अर्ज मंजूर होवून मिळणेसाठी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी क्र. २ याने त्यांचे म्हणणे दाखल केले असून अर्जातील कथने नाकारली आहेत. प्रतिवादीचे म्हणणे की, वादी ऊषा सोडमिसे यांनी तिच्याकरीता दावा हा काढून घेतला असल्यामुळे तिला अर्ज दाखल करता येणार नाही म्हणून अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. अर्ज वाचला. युक्तीवाद ऐकला. वादींनी प्रस्तुत दावा हा दावा मिळकतीचे वाटप होवून मिळणेसाठी व जाहिर ठराव होवून मिळणेसाठी दाखल केला आहे. दावा प्रलंबीत असताना प्रतिवादी क्र.१ हनुमंत भिकु सोडमिसे हे दि. ०१.११.२०२३ रोजी मयत झाले असून त्यांचा मृत्यू दाखला वादी यांनी यादी नि.६५ अन्वये दाखल केला आहे. प्रतिवादी क्र.

१ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी ९७ दिवसांचा विलंब झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. प्रतिवादी क्र.२ यांच्या तक्रारी लक्षात घेता वादी क्र.१ व ३ यांनी दावा काढून घेतला असल्याबाबत नि. २७ अन्वये पुरसीस न्यायालयात दाखल केली आहे. परंतु, त्यानंतर नि.६१ अन्वये पुन्हा दावा चालविण्यासंदर्भात अर्ज दाखल केल्याचे दिसून येते. वादी यांची नि.२७ अनव्ये पुरसीसचे अवलोकन केले असता त्यावर वादी क्र.२ यांची स्वाक्षरी नाही. त्यामुळे दावा हा वादी यांनी काढून घेतला असे म्हणता येणार नाही. प्रस्तुत अर्जाद्वारे मयत प्रतिवादी क्र.१ यांची अर्जात नमुद केल्याप्रमाणे वारस नाही असा प्रतिवादी क्र.२ यांचा आक्षेप नाही. वादी यांना मयत प्रतिवादी क्र. १ यांचे वारस अभिलेखावर घेण्याबाबत ज्ञान नव्हते हे कारण संयुक्तिक वाटत नाही. दावा हा वाटपासाठी व जाहिर ठरावाचा असल्यामुळे मयत प्रतिवादी क्र. १ यांचे वारस अभिलेखावर येणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. सदर दाव्याचे कामकाज हे गुणावगुणावर चालणेसाठी दाव्यामध्ये मयत प्रतिवादी क्र. १ यांच्या वारसांचे म्हणणे अभिलेखावर येणे गरजेचे आहे. तसेच भविष्यात मयत प्रतिवादी क्र. १ यांच्या वारसांचा दावा मिळकतीसंदर्भात आक्षेप राहू नये म्हणून प्रसतुतचा अर्ज हा काही कॉस्ट देण्याच्या अटीवर मंजूर करणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज नि.६८ व ७० हे मंजूर करण्यात येतात.

२. प्रतिवादी क्र. १ यांचे वारस अभिलेखावर घेणेसाठी झालेला ९७ दिवसांचा विलंब हा वादी क्र. २ यांना र.रु. ४००/- देण्याच्या अटीवर माफ करण्यात येतो.

३. वादी यांनी सत्वर दुरूस्ती पुर्तता करावी.

PANKAJ HILAL PATIL

Digitally signed by PANKAJ HILAL PATIL
DN: cn=PANKAJ HILAL PATIL, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6950436, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN
Date: 2024.12.10 17:31:34 +0530

फलटण. (पी. एच. पाटील)

ता. १०.१२.२०२४ ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर फलटण.